Mr. Vivek Chandre Mrs. Alka Chandre	**06/04/2021 Rs. 13,58,240/-** (Rupees Thirteen Lakh Fifty Eight Thousand Two Hundred Forty only) as on 06.04.2021	Flat No. 3, A 2 - 3 JET (RANJANGAON), Playtor Ranjangaon - A Gut No. 697 (Paiki), Village : Karegaon, Taluka : Shirur, Dist - Pune - 412210, Maharashtra	**Rs. 11.00 Lacs Rs. 1,10,000/-**
Mr. Ayoub Shaikh Mr. Sohil Shaikh Mrs. Jakera Shaikh	**04/05/2021 Rs. 10,85,516/-** (Rupees Ten Lakh Eighty Five Thousand Five Hundred Sixteen only) as on 04.05.2021	Flat No. 202, A1, Sangam Realty Chakan Annex Gat No.255, At Shelgaon, Chakan Shikhrapur Road, Near HP Petrol Pump, Taluka Khed, District Pune	**Rs. 10.80 Lacs Rs. 1,08,000/-**
Mr. Sanjaykumar Patil Mrs. Supriya Patil	**06/04/2021 Rs.7,84,051/-** (Rupees Seven Lakh Eighty Four Thousand Fifty One Only) as on 06.04.2021	Flat No. 203, Ganga-D(Plot-1), Shivdarshan Survey No. 905/3, Pune-Solapur Road, Yavat, Taluka-Daund, District-Pune, Pincode 412214	**Rs. 10.30 Lacs Rs. 1,03,000/-**
Mr. Bibhishan Gore Mrs. Savita Bibhishan	**04/05/2021 Rs.3,54,995/-** (Rs. Three Lakh Fifty Four Thousand Nine Hundred Ninty Five Only) as on 04.05.2021	Flat No. 304, R, Vaishnavi City Survey No. 21/1, Devachi Urali,Tal : Haveli, Dist: Pune - 412308	**Rs. 8.00 Lacs Rs. 80,000/-**
Mrs. Sunita Varkad Mr. Govind Varkad	**06/04/2021 Rs.8,89,613/-** (Rs. Eight Lakh Eighty Nine Thousand Six Hundred Thirteen Only) as on 06.04.2021	Flat No. 320, B3, Xrbia Abode Gat No 240, Jambhul Rd, Jambhul, Taluka-Mawal, District-Pune	**Rs. 6.80 Lacs Rs. 68,000/-**
Mrs. Anjana Kiran Ghodake Mr. Kiran Suresh Ghodake	**02/11/2019 Rs. 6,33,454/-** (Rupees Six Lakh Thirty Three Thousand Four Hundred Fifty Four Only) as on 02.11.2019	Flat No. 312, Shree Ganesha Apartment, Shree Ganesha Apartment Plot Nos. 29,30 & 31, Survey No. 57/2A + 8A, Songaon, Taluka & District - Satara	**Rs. 6.80 Lacs Rs. 68,000/-**
Mrs. Komal Amar Kamble Mr. Amar Balaso Kamble	**03/12/2019 Rs. 3,87,464/-** (Rupees Three Lakh Eighty Seven Thousand Four Hundred Sixty Four Only) as on 03.12.2019	Flat No. 313, Shree Ganesha Apartment, Shree Ganesha Apartment Plot Nos. 29,30 & 31, Survey No. 57/2A + 8A, Songaon, Taluka & District - Satara	**Rs. 6.10 Lacs Rs. 61,000/-**
Mrs. Hemlata Pramod Chavare Mr. Pramod Krishnaji Chavare	**06/04/2021 Rs.8,46,167/-** (Rs. Eight Lakh Forty Six Thousand One Hundred Sixty Seven Only) as on 06.04.2021	Flat No. 404, H, Vaishnavi City Survey No. 21/1, Devachi Urali,Tal : Haveli, Dist: Pune - 412308	**Rs. 10.25 Lacs Rs. 1,25,000/-**

◆ Date and Time of Inspection : 23.09.2021-11.00 AM to 1.00 PM ◆ Last date & time of deposit of EMD : 25.09.2021 up to 5.00 PM
◆ Date and Time of Auction : 27.09.2021 - 11.00 AM to 12.00 PM

TERMS AND CONDITIONS OF E-AUCTION SALE: The sale shall be subject to the Terms & Conditions prescribed in the Security Interest (Enforcement) Rules 2002 and to the following further conditions:

i. The properties are being sold on **'AS IS WHERE BASIS IS.**
ii. The particulars of Secured Assets specified in the Schedule herein above have been stated to the best of the information of the Authorised Officer, but the Authorised Officer shall not be answerable for any error, misstatement or omission in this proclamation.
iii. The secured asset will not be sold below the reserve price.
iv. The auction sale will be "through Auction-Cum-Tender".
v. The bidders are also advised for detailed terms and conditions The interested bidders shall deposit the EMD by way of Demand Draft favoring "SMHFC LTD" or through NEFT/RTGS A/c No. 00608940000020 IFSC Code : HDFC0000060 " as per above mentioned account numbers The draft should not be of a Cooperative-Bank.
vi. Bidder is to submit these documents through e-mail to the Authorised Officer at e-mail address and also to submit self attested hard copies of these documents (Demand Draft in original) to the Authorised Officer, at the Branch address mentioned herein above in the envelope super scribing as 'Bid in the A/C (mention the account Name)
vii. Others detailed Terms and Conditions available on website **www.svatantramhfc.com.**
Further enquiries may be clarified with the Authorized Officer, SMHFC, Mr. Sharik Saudagar (MO-8879666943 or 022-26101076-79
Email sharik.saudagar@mhfcindia.com

Authorised Officer
Svatantra Micro Housing Finance Corporation Ltd (SMHFC)
(Secured Creditor)

Place : Mumbai
Date : 27.08.2021

संक्षिप्त

खेळाडूंना विलगीकरणातून सूट द्यावी : 'फिफा'

जिनिव्हा : इंग्लिश प्रीमियर लीगमधील खेळाडूंना विश्वचषकाच्या पात्रता फेरीत खेळण्यासाठी विलगीकरणातून सूट देण्यात यावी, अशी मागणी 'फिफा'चे अध्यक्ष जिआनी इन्फान्टिनो यांनी ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्याकडे केली आहे. प्रीमियर लीगमधील १९ क्लब्सच्या एकूण ६० खेळाडूंना विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या पात्रता फेरीत आपापल्या देशाचे प्रतिनिधित्व करायचे आहे. परंतु विलगीकरणाचे नियम आणि क्लबसोबतच्या करारामुळे त्यांना या वेळी आंतरराष्ट्रीय संघाकडून खेळता येणार नाही, अशी भूमिका प्रीमियर लीगच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. म्हणून इन्फान्टिनो यांनी स्वतः ब्रिटनच्या पंतप्रधानांना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली आहे.

राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा १५ सप्टेंबरपासून

नवी दिल्ली : कर्नाटक येथे १५ ते २२ सप्टेंबरदरम्यान पुरुषांच्या राष्ट्रीय अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल, असे भारतीय बॉक्सिंग महासंघाने गुरुवारी जाहीर केले. गतवर्षी करोनामुळे रद्द करण्यात आलेल्या या स्पर्धेत या वेळी खेळाडूंना 'हेडगार्ड' वापरण्याची परवानगी देण्याबाबत विचार सुरू आहे. यंदा १० ऐवजी १३ वजनी गटांमध्ये बॉक्सिंगपटूंना विभागण्यात आले असून नोव्हेंबरमध्ये बेलग्रेड येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी खेळाडूंना लय पकडण्याची ही अखेरची संधी असेल.

रमिझ राजा पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष?

कराची : माजी कर्णधार रमिझ राजा यांची पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) अध्यक्षपदी निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. एहसान मणी यांनी तीन वर्षांचा कार्यकाळ २५ ऑगस्टला संपणार असून, त्यांनी पुढील कार्यकाळ सांभाळण्यास नकार दिला आहे. त्यामुळे रमिझ यांच्याकडे हे पद सोपवण्यात येणार आहे. मणी आणि रमिझ यांनी गुरुवारी पंतप्रधान इम्रान खान यांची भेट घेतली. याआधी, रमिझ यांनी 'पीसीबी'चे मुख्य कार्यकारी अधिकारीपद सांभाळले होते.

क्रिकेट : मुंबईच्या विजयात जैस्वाल, मुलानी चमकले

मस्कत : यशस्वी जैस्वालची धडाकेबाज अर्धशतकी खेळी आणि कर्णधार शाम्स मुलानीची (३/१२) प्रभावी गोलंदाजी या बळावर गुरुवारी मुंबईने दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात ओमानवर १८ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना जैस्वालच्या ५९ चेंडूंतील ७५ धावांच्या खेळीच्या बळावर मुंबईने ६ बाद १६२ धावा उभारल्या. त्यानंतर गोलंदाजांनी ओमानला ९ बाद १४४ धावसंख्येपर्यंत सीमित ठेवले. त्यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत मुंबईने १-१ अशी बरोबरी साधली आहे. सलामीवीर आकर्षित गोमेल (०), साईराज पाटील (४) आणि हार्दिक तामोरे (४) लवकर बाद झाल्यामुळे मुंबईची ३ बाद ३२ अशी अवस्था झाली. परंतु जैस्वालने आठ चौकार व दोन षटकारांसह डाव सावरला. त्याने अरमान जाफरसह (२०) चौथ्या गड्यासाठी ४० धावांची भागीदारी केली. मग जैस्वालने अमन खानच्या (३१*) साथीने सहाव्या गड्यासाठी ५३ धावांची भागीदारी केली.

आदित्य ठाकरे फुटबॉल प्रशिक्षक संघटनेचे अध्यक्ष

मुंबई : भारतीय फुटबॉल प्रशिक्षकांच्या संघटनेचे अध्यक्षपद बुधवारी राज्याचे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. संघटनेतर्फे संस्थापक-संचालक दिनेश नायर, माजी फुटबॉलपटू स्टीव्हन डायस आणि मुंबई सिटी एफसीचे विकास अधिकारी तनाझ मोहम्मद यांनी नियुक्तीचे पत्र ठाकरे यांना सुपूर्द केले.

ठाण्यात १ सप्टेंबरला कुस्ती निवड चाचणी

ठाणे : बुधवार, १ सप्टेंबर रोजी ठाणे शहर तालीम संघाच्या २३ वर्षांखालील कुस्ती निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार आहे. कुस्तीगीर भवन, गावदेवी, ठाणे येथे फ्री-स्टाइल, ग्रीको रोमन आणि मुलींच्या वजनी गटासाठी ही निवड चाचणी घेण्यात येईल. या चाचणी सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी सर्जेराव शिंदे (९८२०३००३४१) यांच्याशी संपर्क साधावा.

राष्ट्रकुल विजेत्या आप्पालाल शेख यांचे विपन्नावस्थेत निधन



एजाजहुसेन मुजावर, लोकसत्ता

सोलापूर : न्यूझीलंडमध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत अनेक भल्याभल्या मल्लांना लोळवून सुवर्णपदक मिळविलेले 'महाराष्ट्र केसरी' आप्पालाल शेख (वय ५४) यांचे मधुमेह आणि मूत्रपिंडाच्या विकाराने गुरुवारी दुपारी सोलापुरातील एका खासगी रुग्णालयात निधन झाले.

पैलवान लाल मातीत कुस्त्या खेळून लौकिक मिळवेपर्यंत त्यास संस्था, संघटना, शासन, दानशूर व्यक्तींकडून आर्थिक मदत मिळते. परंतु हाच पैलवान कुस्तीच्या आखाड्यातून बाहेर गेला की एकाकी पडतो. आप्पालाल शेख यांच्या बाबतीतही दुर्दैवाने हेच घडले. शारीरिक व्याधी आणि आर्थिक विवंचना यामुळे विपन्नावस्थेत त्यांचा शेवट झाला.

सोलापूरजवळील बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील आप्पालाल शेख यांनी १९९३मध्ये पुण्यातील कुस्ती अधिवेशनात संजय पाटील यांना अस्मान दाखवून 'महाराष्ट्र केसरी'चा किताब पटकावला होता. एकाच घरातून तिघे मल्ल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळविणारे बोरामणीचे एकमेव शेख कुटुंबीय आहे. यापूर्वी त्यांचे थोरले बंधू इस्माईल शेख हे १९८० साली खोपोली येथे कुस्ती अधिवेशनात 'महाराष्ट्र केसरी' झाले, तर त्यांचे पुतणे मुन्नालाल शेख यांनी जालना येथे २००१-०२ साली 'महाराष्ट्र केसरी'ची गदा पटकावली होती.

अल्पभूधारक असलेले शेकुंबर शेख यांना कुस्तीचा छंद असल्यामुळे त्यांनी आपली मुले इस्माईल व आप्पालाल यांना आर्थिक भार सोसत नसतानाही कुस्तीचे धडे घेण्यासाठी १९८५-८६ साली कोल्हापूरला शाहूपुरी तालमीत पाठवले होते. वस्ताद मोहम्मद हनीफ यांच्या तालमीत दोन्ही मुले तरबेज झाली. हिंदकेसरी श्रीपती खंचनाळे आणि वस्ताद मुकुंद करजगार यांनीही त्यांना कुस्तीचे डावपेच शिकवले होते.

आप्पालाल यांनी न्यूझीलंडमधील राष्ट्रकुल स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, इराण, बल्गेरिया व अन्य राष्ट्रांच्या मल्लांना हरवले आणि अंतिम सामन्यात न्यूझीलंडच्या मल्लाला अस्मान दाखवत सुवर्णपदकावर नाव कोरले होते. 'घिस्सा' डाव टाकून कुस्ती जिंकणे ही आप्पालाल यांची विशेष हातोटी होती. महाराष्ट्र शासनाने त्यांना 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' देऊन सन्मानित केले होते.

कुस्तीची घरातील परंपरा पुढे नेण्यासाठी आप्पालाल यांनी आपली मुले अशपाक, अस्लम आणि गौसपाक यांना कोल्हापूरला पाठवले होते. तेथे मुलांचा सराव सुरू असतानाच इकडे गावात आप्पालाल यांचा मधुमेह बळावला आणि मूत्रपिंडाच्या विकाराने ते पछाडले. शासनाकडून मिळणारे मानधन तुटपुंजे आणि तेसुद्धा वेळेवर मिळत नसल्यामुळे शेतीवर अवलंबून राहिलेल्या शेख कुटुंबीयांची परवड सुरू झाली. अशा विपन्नावस्थेत काही दानशूर मंडळींनी मदतीचा हात दिला. आपल्या पित्याची सेवा करण्यासाठी तिन्ही मुलांना कोल्हापूर सोडावे लागले. यातच तीन महिन्यांपूर्वी आप्पालाल यांच्या पत्नीचे निधन झाल्यामुळे ते आणखी खचले. यातच आजार बळावला आणि आप्पालाल यांचा शेवट झाला. सायंकाळी बोरामणी गावात त्यांचे पार्थिव दफन करण्यात आले.

माझ्या नावाचा गैरवापर करू नका!



भालाफेकपटू नीरज चोप्राचे चाहत्यांना आवाहन

पीटीआय, नवी दिल्ली

माझ्यात आणि पाकिस्तानचा प्रतिस्पर्धी अर्शद नदीममध्ये झालेल्या घटनेविषयी समाजमाध्यमांवर विनाकारण अधिक चर्चा रंगत आहे. अर्शदने काहीही चुकीचे कृत्य केलेले नसून माझे नाव वापरून द्वेष पसरवण्याचा गैरप्रकार थांबवा, अशी प्रतिक्रिया भारताचा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने गुरुवारी व्यक्त केली.

पानीपतच्या २३ वर्षीय नीरजने टोक्यो ऑलिम्पिकमध्ये ८७.५८ मीटर अंतरावर भालाफेक करून देशासाठी ॲथलेटिक्समधील पहिले सुवर्णपदक मिळवले. स्पर्धकाचे नाव जाहीर झाल्यानंतर एक मिनिटाच्या आत खेळाडूने भालाफेक करणे गरजेचे असते. मात्र नाव जाहीर झाल्यावर भाला शोधण्यात नीरजचे काही सेकंद वाया गेले. यावेळी त्याचा भाला पाकिस्तानच्या अर्शदकडे असल्याचे दिसून आले. त्यामुळे नीरजने घाईत त्याच्याकडून भाला घेऊन पहिल्या प्रयत्नात ८७.०३ इतक्या अंतरावर भाला फेकला. भालाफेकीत कोणत्याही खेळाडूला अन्य स्पर्धकाचा भाला वापरण्याची परवानगी असते. नीरजने काही दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान याविषयी खुलासा केला. परंतु या प्रसंगामुळे अर्शदच्या खिलाडूवृत्तीवर संशय घेतला जात असून समाजमाध्यमांवर त्याच्यावर टीकेचाही भडिमार करण्यात येत आहे.

''खेळ आपल्या सर्वांना एकत्रित आणतो. परंतु माझ्या खुलाशातून काही जणांनी खेळाडूंमध्येच वैर निर्माण करण्याचे ठरवल्याचे दिसून येत आहे. माझे नाव वापरून विनाकारण हे प्रकरण वाढवले जात आहे. त्यामुळे असे करू नका,'' असे नीरजने 'ट्विटर'वरील चित्रफीतीत म्हटले आहे.

> "अर्शदने माझा भाला वापरून कोणतीही चूक अथवा नियमभंग केलेला नाही. आम्हा सर्वांचे भाले एकाच ठिकाणी ठेवलेले असतात. त्यामुळे कोणीही एकमेकांचा भाला वापरू शकतो. आम्हा सर्व भालाफेकपटूंमध्ये चांगले संबंध असून हे प्रकरण अधिक ताणून आमच्यातील संबंध बिघडवण्याचा प्रयत्न करू नका.
> -नीरज चोप्रा

अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा पूर्ण प्रेक्षक क्षमतेनिशी

मुखपट्टी आणि लसीकरणाच्या पुराव्याची आवश्यकता नाही

एपी, न्यूयॉर्क

करोना साथीमुळे गतवर्षी प्रेक्षकांविना झालेली अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा यंदा पूर्ण प्रेक्षक संख्येनिशी होणार आहे. सामन्यांना हजेरी लावण्यासाठी चाहत्यांना मुखपट्टी किंवा लसीकरणाचा पुरावा दाखवण्याचीही आवश्यकता नसल्याचे संयोजकांनी स्पष्ट केले आहे.

अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा

''आमचा चाहत्यांच्या प्रामाणिकतेवर विश्वास आहे. लसीकरण न झालेल्यांना मज्जाव नसेल. परंतु त्यांनी मुखपट्टी वापरल्यास उत्तम ठरेल,'' असे अमेरिकन टेनिस संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. ब्रायन लेनलाइन यांनी सांगितले. वर्षातील अखेरच्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेला सोमवारपासून न्यूयॉर्क येथे प्रारंभ होत आहे.

अमेरिकेत प्रतिदिन दीड लाख नागरिकांना करोनाच्या डेल्टा उत्परिवर्ताची लागण होत आहे. मात्र स्पर्धेची नियमावली ही रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्र आणि न्यूयॉर्क शहराच्या नागरी आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित आहे.

टेनिसपटूंना आणि त्यांच्या मार्गदर्शकांना स्पर्धेदरम्यान शहरात फिरण्यास परवानगी देण्यात आली आहे. गर्दीची ठिकाणे टाळा, हा सल्ला मात्र त्यांना देण्यात आला आहे. खेळाडूंनाही लसीकरणाची अट घालण्यात आलेली नाही. परंतु न्यूयॉर्कला आल्यावर आणि प्रत्येक चार दिवसांनी करोना चाचणी बंधनकारक असेल. चाचणीचा निकाल सकारात्मक आल्यास खेळाडूला १० दिवसांचे विलगीकरण करावे लागेल आणि स्पर्धेतून माघार घ्यावी लागेल.



केनिनची माघार

लसीकरण झाले असतानाही करोनाची लागण झाल्यामुळे जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या सोफिया केनिनला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतून माघार घ्यावी लागली आहे. समाजमाध्यमावर 'निराशाजनक बातमी' असे नमूद करीत बुधवारी केनिनने आपला निर्णय जाहीर केला. अमेरिकेच्या २२ वर्षीय केनिनने २०२०च्या ऑस्ट्रेलियन स्पर्धेत विजेतेपद, तर गतवर्षी फ्रेंच स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले होते. याशिवाय गतवर्षी अमेरिकन स्पर्धेत तिने चौथ्या फेरीपर्यंत मजल मारली होती. ''सुदैवाने माझे लसीकरण झाले आहे, तरीही करोनाची सौम्य लक्षणे मला जाणवत आहेत. त्यामुळे पुढील आठवड्यात होणाऱ्या अमेरिकन खुल्या स्पर्धेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे केनिनने म्हटले आहे. त्यामुळे अमेरिकन स्पर्धेतून माघार घेणाऱ्या मातब्बर टेनिसपटूंची संख्या वाढत आहे.

माघार घेणारे मातब्बर टेनिसपटू

रॉजर फेडरर, राफेल नदाल, स्टॅन वॉवरिंका, डॉमिनिक थीम, मिलोस राओनिच, सेरेना विल्यम्स, व्हीनस विल्यम्स.

प्रज्ञेश पात्रतेच्या दुसऱ्या फेरीत

न्यूयॉर्क : भारताचा आघाडीचा टेनिसपटू प्रज्ञेश गुणेश्वरनने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या पात्रतेची दुसरी फेरी गाठताना कॅनडाच्या ब्रेडेन श्नूरला नामोहरम केले. जागतिक क्रमवारीत १२६व्या स्थानावर असलेल्या प्रज्ञेशने २३२व्या क्रमांकावरील ब्रेडेनचा ६-४, ७-६ असा पराभव केला. २०१९मध्ये प्रज्ञेशने मुख्य फेरीपर्यंत मजल मारली होती. त्यावेळी पहिल्याच फेरीत रशियाच्या डॅनिल मेदव्हेदेवकडून पराभवामुळे त्याचे आव्हान संपुष्टात आले होते. सुमित नागल, रामकुमार रामनाथन यांनी पहिल्याच फेरीत गाशा गुंडाळल्यामुळे पुरुष एकेरीत भारताकडून फक्त प्रज्ञेशचे आव्हान शिल्लक आहे. महिला एकेरीत अंकिता रैनाचेही आव्हान संपुष्टात आले आहे.


भाविना उपउपांत्यपूर्व फेरीत; सोनल स्पर्धेबाहेर

पीटीआय, टोक्यो

भारताची आघाडीची क्रीडापटू भाविना पटेलने गुरुवारी टोक्यो पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिस प्रकारात महिला एकेरीची उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. सोनल पटेलला मात्र साखळीतच गाशा गुंडाळावा लागला.

पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धा

३४ वर्षीय भाविनाने ब्रिटनच्या मेगान शॅक्लेटॉनला ३-१ (११-७, ९-११, १७-१५, १३-११) असे संघर्षपूर्ण लढतीत नमवले. पहिल्या लढतीत पराभव पत्करणाऱ्या भाविनाने 'अ' गटात दोन सामन्यांत तीन गुण मिळवून दुसऱ्या स्थानासह बाद फेरीत प्रवेश केला. दक्षिण कोरियाच्या ली-मि ग्यूने भारताच्या सोनलवर १०-१२, ११-५, ११-३, ११-९ अशी पिछाडीवरून मात केली. सलग दोन लढती गमावल्यामुळे सोनमचे एकेरीतील आव्हान संपुष्टात आले.



जलतरणपटू सुयश एका शर्यतीला मुकणार

अर्जुन पुरस्कार विजेता सुयश जाधव आजारामुळे जलतरणातील २०० मीटर शर्यतीला मुकणार आहे. सुयशच्या करोना चाचणीचा निकाल नकारात्मक आला असला, तरी सर्दी आणि घसा खवखवल्यामुळे त्याला दोन दिवस विश्रांती घेण्याचे आदेश डॉक्टरांनी दिले आहेत. त्यामुळे शुक्रवारी होणाऱ्या पहिल्या शर्यतीत तो सहभागी होणार नाही, अशी माहिती भारताचे पथकप्रमुख गुरशरण सिंग यांनी दिली. आता सुयश १ सप्टेंबरला १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक आणि ३ सप्टेंबर रोजी ५० मीटर बटरफ्लाय शर्यतीत भारताचे प्रतिनिधित्व करेल.

सहा कुस्तीपटू अंतिम फेरीत

पीटीआय, दुबई

दुबई येथे चालू असलेल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत भारताच्या सहा कुस्तीपटूंनी अंतिम फेरी गाठली आहे. यापैकी दोन कुस्तीपटूंना कझाकस्ताचे प्रतिस्पर्धी विलगीकरणात दाखल झाल्यामुळे पुढे चाल देण्यात आली आहे.

आशियाई युवा कुस्ती स्पर्धा

महिलांमध्ये सिम्रन वर्मा (५२ किलो) आणि स्नेहा (६६ किलो) यांना अनुक्रमे खाव्हा बोल्कोयेव्हा आणि अनार टुर्यनबेक यांना करोनामुळे माघार घ्यावी लागल्यामुळे आगेकूच करता आली. प्रीती (५७ किलो) आणि प्रीत दहिया (६० किलो) यांनी आधीच अंतिम फेरी गाठली आहे.

याचप्रमाणे पुरुषांमध्ये वंशराज (६४ किलो) आणि विशाल (८० किलो) यांनी अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे.

२०३२च्या ऑलिम्पिक स्पर्धेपर्यंत उत्तर प्रदेश सरकार कुस्तीचे पुरस्कर्ते

पीटीआय, नवी दिल्ली



उत्तर प्रदेश सरकारकडून २०३२च्या ऑलिम्पिकपर्यंत कुस्ती क्रीडा प्रकाराला पुरस्कृत करण्याचा निर्णय घेतला आहे. पायाभूत सुविधा आणि कुस्तीपटूंना पाठबळ देण्यासाठी १७० कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित आहे, अशी माहिती भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंग यांनी गुरुवारी दिली.

ओदिशा सरकारने हॉकीला पुरस्कृत केले आहे. यातून प्रेरणा घेत संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी उत्तर प्रदेश सरकारकडे साहाय्याचा प्रस्ताव ठेवला होता. तो मुख्यमंत्री योग आदित्यनाथ यांनी त्वरित स्वीकारला, असे ब्रिजभूषण यांनी सांगितले.

''२०२४च्या ऑलिम्पिकपर्यंत प्रत्येक वर्षाला १० कोटी रुपये, २०२८च्या ऑलिम्पिकपर्यंत प्रत्येक वर्षाला १५ कोटी रुपये आणि २०३२च्या ऑलिम्पिकपर्यंत प्रत्येक वर्षाला २० कोटी रुपये निधीविषयी या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. पुरस्कर्त्यांची रक्कम फक्त नामांकित कुस्तीपटूंपुरती मर्यादित नसेल, तर कनिष्ठ गटातील कुस्तीपटूंनाही त्याचा फायदा होईल,'' असे ब्रिजभूषण यांनी म्हटले आहे. याआधी २०१८मध्ये टाटा मोटर्सने भारतीय कुस्ती संघटनेशी मुख्य पुरस्कर्ते म्हणून करार केला होता. या करारापोटी संघटनेला १२ कोटी रुपये मिळाले होते. त्यामुळेच टोक्यो ऑलिम्पिकपर्यंत कुस्तीपटूंना मध्यवर्ती करार मिळाला होता.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-०१

प्रवेश जाहिरात

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक खाजगी संस्थाद्वारे विनाअनुदानित तत्त्वावर, इयत्ता दहावी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांकरिता मराठी माध्यमातून ''पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन'' द्विवर्षीय पदविका अभ्यासक्रम राबविला जातो. अभ्यासक्रमाच्या सन २०२१-२२ या शैक्षणिक सत्राचे प्रथम वर्ष प्रवेश केंद्रीयभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे ऑनलाईन संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून होणार आहे. त्याकरिता माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज, प्रथम वर्ष प्रवेशाकरिता पात्र पदविका विद्यालयाची यादी व प्रवेशाबाबत सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.mafsu.in वर दिनांक ३१/०८/२०२१ पासून उपलब्ध राहतील.

स्वा/-
अधिष्ठाता (नि.शि)
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
नागपूर

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र. : ०२२-२२७९ ३०२६
E-mail : ds3_socjustice@maharashtra.gov.in

क्रमांक : बीजीटी-२०२१/प्र.क्र.४५/अर्थसंकल्प **दि. २५.०८.२०२१**

-: निविदा सूचना :-

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागातील वित्तीय बाबींचा डेटा मिळविण्याबाबत आणि त्यावरील अनुज्ञेय कर व रिटर्न वेळोवेळी भरण्याकरिता एक एजन्सी नियुक्त करण्याबाबतची निविदा प्रक्रिया शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आपला,
स्वाक्षरी/-
(प्रशांत पुं. वाघ)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

डीजीआयपीआर/२०२१-२२/१७२६

नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: दुसरा मजला, सनटेक सेंटर, ३७/४० सुभाष रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७. टेलि. नं.: ०२२-६६५०९९९९, फॅक्स नं.: ०२२-६६५०९८००, वेबसाइट: www.nfil.in, ईमेल: info@nfil.in, सीआयएन: एल२४११०एमएच१९९८पीएलसी११५४९९

Responsible Care®

भागधारकांकरिता सूचना
इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) यामध्ये समन्याय भागांचे स्थानांतरण

आयईपीएफ (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर ॲण्ड रिफंड) रूल्स २०१६, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम २०१३च्या कलम १२४च्या अनुसार, कंपनीला आयईपीएफ ॲथोरिटीकडे, सलग सात वर्षांच्या किंवा त्याअधिक कालावधीत लाभांशाचे प्रदान झालेले नाही/ त्यावर दावा न करता राहिलेले आहेत अशा भागांचे स्थानांतरण करणे आवश्यक आहे. सदर भागांच्या स्थानांतरणाकरिता पुढील नियत तारीख २७ नोव्हेंबर, २०२१ ही आहे. उक्त नियमांच्या अनुसार, कंपनी सदर भागधारकांशी स्वतंत्र पत्रव्यवहार करीत आहे, ज्यांचे भाग आयईपीएफकडे स्थानांतरणाकरिता नियत ठरले आहेत. कंपनीने तिच्या www.nfil.in या तिच्या वेबसाइटवर सदर भागधारकांचा सविस्तर तपशीलसुद्धा अपलोड केलेला आहे.

भागधारकांना याअधिक सूचना देण्यात येते की, त्यांनी उशिरात उशिरा १२ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत २०१४-१५ पासूनचे अंतरिम लाभांशाचे प्रदान न झालेल्या/ दावा न केलेल्या लाभांची वटवणी/ दावा करावा जेणेकरून सदर भागांचे आयईपीएफकडे स्थानांतरण होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी की, नियत तारखेनुसार जर लाभांश दावा न करता/ त्याचे प्रदान न होता तसेच राहिले तर कंपनी सदर भागधारकांच्या भागांच्या स्थानांतरणाकरिता प्रारंभिक कार्यवाही सुरू करील.

आयईपीएफकडे लाभांशाचे व भागांचे स्थानांतरण झाल्यानंतर, भागधारक नियमानुसार वेब फॉर्म आयईपीएफ-५ मध्ये आयईपीएफकडे अर्ज करून सदर भागांकरिता दावा करू शकतील. उक्त वेब फॉर्म www.iepf.gov.in या आयईपीएफच्या वेबसाइटवर व www.nfil.in या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

वरील बाबतीतील कोणत्याही शंकांकरिता, भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजन्ट: मेसर्स केफिन टेक्नोलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड, युनिट: नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड, कार्व्हि सेलेनियम, टॉवर, 'बी', प्लॉट नं. ३१-३२, गाचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद- ५०००३२, टेलि.: +९१ ०४०६७१६१६२२/ +९१ ०४०६७१६१६२७, ईमेल आयडी: einward.ris@kfintech.com येथे संपर्क साधावा.

नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
निरज बी. मंकड
अध्यक्ष विधि व कंपनी सचिव

स्थळ: मुंबई
दिनांकित: २६ ऑगस्ट, २०२१

PADMANABH MAFATLAL GROUP
Creating value. Sharing value.

SBI भारतीय स्टेट बँक
प्रादेशिक व्यवसाय कार्यालय, अंधेरी
स्नेहल चेम्बर्स, तेली गल्ली, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०००६९.

सोन्याच्या लिलावाची सूचना

विशेषत: कर्जदार तसेच सर्वसाधारणपणे सर्व जनतेस एतद्वारे सूचित करण्यात येते कि खाली उल्लेख केलेल्या तारखेवर खाली दिलेल्या शाखांवर तारण म्हणून दिलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा जाहीर लिलाव आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. नोंदणीकृत पत्रांद्वारे सूचित करुनही ज्या ग्राहकांनी त्यांच्या कर्जाची रक्कम भरली नाही अशा कसूरवार ग्राहकांच्या सोन्याच्या दागिन्यांचा हा लिलाव आहे. स्थळ व तारखेत, जर कोणताही बदल झाल्यास, तो लिलाव केंद्रावर प्रदर्शित केला जाईल. लिलाव न झालेल्या सोन्याच्या वस्तूंचा, लिलाव केंद्रावर तपशील दर्शविल्यानंतर, पुढच्या कामकाजाच्या दिवसांवर लिलाव केला जाईल.
हा लिलाव दि. ३०/०८/२०२१ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून, भारतीय स्टेट बँकेच्या खालील शाखांवर आयोजित केला जाईल.

१) अंधेरी पूर्व शाखा : राज चेम्बर्स, सेठ नागरदास रोड, अंधेरी पूर्व, मुंबई. **२) अंधेरी पश्चिम शाखा :** राहुल अपार्टमेंटस्, शॉपर्स स्टॉप समोर, एस.व्ही.रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई. **३) चांदिवली शाखा :** तळ मजला, एव्हरशाईन सफायर, चांदिवली फार्म रोड, मुंबई. **४) चारकोप शाखा :** कृष्णा पॅलेस, सेक्टर क्र. १ आणि २, चारकोप मार्केट, एचडीएफसी बँकजवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई. **५) गोकुळधाम शाखा :** बी-२, पहिला मजला, शगून मॉल, गोकुळधाम, फिल्मसीटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई. **६) गोरेगांव पश्चिम शाखा :** जवाहर नगर ९, एस.व्ही.रोड, गोरेगांव (पश्चिम) मुंबई. **७) गोरेगांव पूर्व शाखा:** १२, जयप्रकाश नारायण रोड नं. २, गोरेगांव पूर्व, मुंबई. **८) जोगेश्वरी पूर्व शाखा:** साई रेसिडेन्सी कॉ.हौ.सो., जी/०१, नटवर नगर रोड नं.३, जोगेश्वरी पूर्व, मुंबई. **९) जुहू तारा शाखा :** श्री ललिता, फ्लाईंग क्लब जवळ, जुहू तारा रोड, जुहू, मुंबई. **१०) जुहू वर्सोवा लिंक रोड शाखा :** जुहू वर्सोवा लिंक रोड, संगम कॉ.हौ.सो., अंधेरी पश्चिम मुंबई. **११) लोखंडवाला कॉम्प्लेक्स शाखा :** ४ मोन्टाना ॲनेक्स, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी पश्चिम, मुंबई. **१२) मालवणी शाखा :** शॉप नं. १, सवेरा हाईटस्, खारोडी, मालवणी गेट नं. - ५, मालवणी पोलीस स्टेशन समोर, मालाड पश्चिम, मुंबई. **१३) माइंड स्पेस मालाड पश्चिम शाखा :** जी-२, युरेखा टॉवर, लिंक रोड, मालाड पश्चिम , मुंबई. **१४) पीबीबी अंधेरी शाखा :** शॉप नं. ४, हब टाऊन सोलारिस, एनएस फडके मार्ग, अंधेरी पूर्व. **१५) सफेद पुल शाखा :** ३/३४ सागर पलाझिओ, अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका जंक्शन, मुंबई. **१६) साकीनाका शाखा :** साकी-विहार रोड, लेखराज भवन, साकीनाका, मुंबई. **१७) एसबीआय ऑफिसर्स क्वार्टर्स गोकुळधाम शाखा :** ए-६४, एसबीआय ऑफिसर्स क्वार्टर्स, गोकुळधाम, गोरेगांव पूर्व, मुंबई. **१८) वर्सोवा शाखा :** एव्हरशाइन अपार्टमेंटस्, चार बंगलो, जे.पी. रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई.

प्राधिकृत अधिकारी,
भारतीय स्टेट बँक करीता